# पुणे विद्यापीठ

## प्रथम वर्ष कला, विज्ञान, वाणिज्य व विज्ञान (संगणक) अभ्यासक्रम

## विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी मार्गदर्शक तत्त्वे

१. प्रथम वर्ष प्रवेशाच्या बाबतीत विद्यापीठाने दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार प्रवेश देणे ही प्राचार्यांची जबाबदारी राहील.

२. ज्या वरिष्ठ महाविद्यालयांना कनिष्ठ महाविद्यालयांचे वर्ग जोडलेले असतील/त्या संस्थेचे अन्य कनिष्ठ महाविद्यालय असतील तर तेथील उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रथम वर्षात प्रवेश देतांना प्राधान्य देण्याचा अधिकार प्राचार्यांना राहील.

३. प्रथम वर्षासाठी निर्धारित केलेल्या प्रत्येक तुकडीतील पर्याप्त विद्यार्थी संख्या विद्यापीठाची व शासनाची मंजूरी मिळाल्याप्रमाणे राहील. प्रथम वर्षाच्या निर्धारित प्रवेशक्षमतेपेक्षा जास्त प्रवेश झाल्याचे आढळून आल्यास संबंधित विद्यार्थ्यांना परीक्षेस पात्र धरले जाणार नाही. या सूचनेचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

४. शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आरक्षणाच्या धोरणानुसार प्रवेश करणे बंधनकारक आहे.

५. Foreign Student (Foreign Nationals, P.I.O. & Children of Workers in Gulf & S. E. Asia) या विद्यार्थ्यांचे प्रवेश, मंजूर प्रवेश क्षमतेच्या १५ टक्के असतील. हे प्रवेश शासनाने व विद्यापीठाने मंजूर केलेल्या प्रवेश क्षमतेपेक्षा जास्तीचे असतील (over and above) व ते विद्यापीठाच्या आंतरराष्ट्रीय केंद्रामार्फत होतील.

६. एन.आर.आय. (Gulf & S. E. Asia सोडून इतर देशातील भारतीय) विद्यार्थ्यांसाठी १० टक्के जागा मंजूर प्रवेश क्षमतेमधील असाव्यात व प्रवेश संबंधित महाविद्यालयांनी करावयाचे आहेत.

७. इतर राज्यातील विद्यार्थ्यांसाठी प्रवेश देताना त्या महाविद्यालयातील प्रत्येक वर्गाच्या प्रथम वर्ष तुकडीस मंजुर असलेल्या विद्यार्थी संख्येच्या १० टक्के याप्रमाणे त्या त्या तुकडीत प्रवेश देण्यात यावेत. सदर विद्यार्थी संख्या तुकडीस मंजुर असलेल्या विद्यार्थी संख्येतच समाविष्ट असेल. या नियमाचे काटेकोरपणे पालन करणे महाविद्यालयांवर बंधनकारक आहे. विद्यार्थी इतर राज्यातील आहे, हे ठरवितांना विद्यापीठाच्या पातत्रेसंबंधी जारी केलेल्या परिपत्रकातील व्याख्येचा उपयोग करावा.

८. अभ्यासक्रमानुसार प्रवेशित विद्यार्थ्यांची खुल्या प्रवर्गातील/ मागासवर्गीय/इतर मागासवर्गीय व इतर विद्यार्थ्यांची गुणवत्तेनुसार यादी स्वतंत्रपणे प्रवेश प्रक्रिया संपल्यानंतर (सीडीमध्ये) विद्यापीठाकडे आठ दिवसात पाठविण्याची कार्यवाही करण्यात यावी.

९. प्रत्येक अभ्यासक्रमाची गुणवत्ता यादी प्रवेश सुरु झाल्यापासून ८—८ दिवसात प्रसिध्द करुन सूचना फलकावर लावण्यात यावी. खुल्या प्रवर्गातील व मागासवर्गीय/इतर मागासवर्गीय व इतर विद्यार्थ्यांची यादी स्वतंत्र लावावी.

१०. विद्यापीठाच्या आदेश क्र. २२५, दिनांक १५.१.२०१० नुसार शैक्षणिक शुल्क व इतर शुल्क घ्यावयाचे आहेत. शुल्कासंबंधी आदेश पी.जी.एस. ७८५२ दि. २३.१२.२००९ विद्यापीठाच्या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

११. महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी काढलेल्या आदेशानुसार विद्यापीठ अनुदान आयोगाने दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार व पुणे विद्यापीठ कायदा, अध्यादेश व परिनियमांच्या अधिन राहून प्रवेश करावेत.

१२. कोणत्याही विद्यार्थ्याला त्याच्या इच्छेविरुध्द कोणत्याही वर्गात एखादा विषय घेण्याची सक्ती करण्यात येऊ नये. संबंधित वर्गाची क्षमता संपल्यानंतर त्याला त्या पध्दतीने मार्गदर्शन करावे.

१३. वर उल्लेख केलेल्या बाबींशिवाय प्रथम वर्ष अभ्यासक्रमाच्या प्रवेशासंबंधी एखादी समस्या निर्माण झाल्यास त्या समस्येचे निराकरण मार्गदर्शक तत्त्वांच्या आधिन राहून करण्याची जबाबदारी संबंधित प्राचार्यांवर राहील.

१४. पुणे विद्यापीठ परिपत्रक १६८ प्रमाणे (सक्तीची आरोग्य सेवा योजना) कार्यवाही करण्यात यावी.

१५. जम्मू—काश्मिर विस्थापित विद्यार्थ्यांचे प्रवेश शासनाने दिलेल्या मान्यतेनुसारच प्रत्येक अभ्यासक्रमासाठी १ जागा याप्रमाणे देण्यात यावे. यासाठी शासनाने वेळोवळी निर्गमीत केलेल्या आदेशाचे पालन करावे.

१६. प्रथम वर्ष विज्ञान, जैवतंत्रज्ञान या अभ्यासक्रमाचे प्रवेश संबंधित महाविद्यालयाने गुणवत्ता व आरक्षणाबाबतचे धोरण लक्षात घेऊन करावयाचे आहेत.

वरील सर्व सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

उपकुलसचिव, 15/5/10

शैक्षणिक प्रवेश विभाग

# विहित नमुना

प्रथम वर्ष कला, विज्ञान, वाणिज्य व विज्ञान (संगणक) अभ्यासक्रमाच्या प्रवेशासंबंधीची माहिती :

१. महाविद्यालयाचे नाव, पत्ता, फोन नंबर, फॅक्स नंबर, मोबाईल नंबर, ई—मेल आयडी.
२. प्रथम वर्ष अभ्यासक्रमाच्या एकूण तुकडया.
३. प्रत्येक तुकडीकरीता प्रवर्गानुसार उपलब्ध असलेली जागा.
४. प्रत्येक तुकडीत प्रवर्गानुसार प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांची संख्या.
५. प्रत्येक तुकडीतील शेवटच्या विद्यार्थ्यांची प्रवर्गासाठी गुणांची टक्केवारी.

प्राचार्यांची सही व शिक्का

<u>टिप</u> : १. दरवर्षी महाविद्यालयांकडून प्रवेशित विद्यार्थ्यांची यादी मागविण्यात येते. परंतु ठराविकच महाविद्यालये अशी यादी विद्यापीठाकडे पाठवितात. तरी सर्व प्राचार्यांना विनंती की, प्रवेशित विद्यार्थ्यांची यादी शैक्षणिक प्रवेश विभागाकडे पाठवावी, अन्यथा विद्यापीठाकडून योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करण्यात येईल.

<u>टिप</u> : २. Three seats per division are reserved for students passing Engineering Diploma Course.

(टिप — २ ही फक्त विज्ञान (संगणक) अभ्यासक्रमासाठी लागू आहे.)